# सघन पध्दतीने करा पेरूची लागवड

प्रा. प्रविण बा. मांजरे प्रा. बी. बी. तांबोळकर
सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग,
सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालय, बीड



पेरू हे कमी पाण्यावर व कोणत्याही जमिनीत येणारे फायदेशीर पीक आहे. इतर फळझाडांच्या तुलनेत पेरूचे पिक कमी खर्चाचे हमखास उत्पादन देणारे आणि कमी मेहनतीचे असल्याने ह्या पिकाच्या लागवडीस भरपूर वाव आहे. इतर फळ पिकाप्रमाणे यावर जास्त रोग देखील पडत नाही. त्यामुळे किंबहुना उत्पादनासाठी लागणारा खर्च देखील कमी आहे. सघन पद्धतीतून लागवड केल्यास दुसऱ्याच वर्षी फळ उत्पादन सुरू होते. कमी पाण्याची उपलब्धता असणाऱ्या व मुबलक पाणी असलेल्या शेतकऱ्यांसाठी पेरू पीक हे एक वरदानच ठरत आहे.

पेरू पिकाचे वैशिष्ट्ये म्हणजे पेरूची फळे रूचकर आणि इतर फळांच्या तुलनेत स्वस्त असल्यामूळे पेरूचे फळ सर्व लोकांमध्ये प्रिय आहे. पेरूच्या फळामध्ये 'क' जीवनसत्व तसेच खनिजद्रव्ये भरपूर प्रमाणात असतात. पेरूच्या फळापासून जॅम, जेली, आईस्क्रीम, सरबत तसेच हवाबंद डब्यातील फोडी तयार करता येतात. पेरूचे झाड टणक असल्यामूळे शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी झाडाचा उपयोग होतो.

## सुधारित जाती:

सरदार (लखनऊ-४९), ललित, अलाहाबाद सफेद, पंत प्रभात, श्वेता, अर्का मृदुला, अर्का अमूल्य, सफेद जाम, कोहिनूर सफेद, धारदार, हाफसी, हिस्सार सूरखा, हिस्सार सफेद, पंजाब पिंक, नाशिक, चित्तीदार, बेहत कोकोनट, रेड फ्लेशड, जी विलास, तैवान पिंक, व्हीं एन आर इत्यादी जाती आहेत.

परंतु महाराष्ट्रात यापैकी व्यापारीदृष्ट्या मुख्यतः सरदार (एल-४९), ललित, तैवान पिंक आणि जी विलास या जातीची जास्तीत जास्त लागवड केली जाते.

## लागवड करताना घ्यावयाची काळजी:

पेरूच्या लागवडीसाठी जोमदार वाढीची आणि निरोगी कलमे निवडावीत. कलमाच्या लागवडीसाठी ५० X ५० X ५० आकाराचे खड्डे घ्यावेत. खड्डा भरताना यामध्ये जैविक खताचे मिश्रण (शेणखत/गांडूळखत: १० किलो प्रती खड्डा + अझोटोबॅक्टर, पी.एस.बी, के.एम.बी., ट्रायकोडर्मा, निंबोळी पेंड प्रत्येकी ५० ग्रॅम प्रती खड्डा + फॉलीडॉल पावडर १०० ग्रॅम) आणि सिंगल सुपर फॉस्फेट ५०० ग्रॅम असे मिश्रण तयार करून टाकावे.

कलमांची लागवड कमी पावसाच्या भागात पावसाळ्याच्या सुरूवातीला आणि जास्त पावसाच्या भागात पाऊस संपल्यावर म्हणजे सप्टेंबर महिन्यामध्ये करावी. लागवड केल्यानंतर नवीन झाडाला काठीचा आधार द्यावा. कलमांना सुरूवातीला पाण्याचा ताण पडून देऊ नये.

## पेरूची सघन लागवड पध्दत:

पेरूच्या सघन लागवड पध्दतीमध्ये २X१ मीटर (६X३ फूट) (५००० झाडे/हेक्टरी), ३X१.५ (२२२२ झाडे/हेक्टरी), ३X३ (११११ झाडे/हेक्टरी) अंतरावर लागवड केली जाते. बऱ्याच ठिकाणी २.५ X२.५ (१६०० झाडे/हेक्टरी), (७.५X७.५ फुट) अंतरावर लागवड केली जात आहे.

जर आपण २X१ मीटर अंतरावर लागवड केली असेल तर आपल्याला वर्षातून तीन छाटण्या

कराव्या लागतात. यासाठी मजुरांची गरज जास्त लागते. याचा विचार करता ७.५X७.५ फूट अंतरावर लागवड कमी खर्चिक आहे.

### ७.५X७.५ फूट लागवड अंतराचे तंत्रज्ञान:

- जर आपण पेरूची लागवड ७.५X७.५ फूट अंतरावर केली तर एकरी पेरूचे ७७४ झाडे बसतात आणि अशा पध्दतीने एकरी १५ ते १८ टनापर्यंत उत्पादन मिळते. पेरूच्या प्रतीमध्ये चांगली सुधारणा होते.
- सघन पध्दतीने लागवड केल्यामुळे ठिबक सिंचन पध्दतीचा वापर करून पिकाला गरजेनूसार पाणी देता येते. जमिनीत सतत वाफाचा परिस्थिती राहिल्यामुळे उत्पादनात वाढ होते.
- मे महिन्यात एकदाच चांगली छाटणी केली तर पेरूचे चांगले उत्पादन मिळते. पेरूच्या झाडाची जास्त वाढ होत असेल तर सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात वाढणारा शेंडा हाताच्या सहाय्याने एकदाच काढला तर पुढची वाढ थांबते व त्यामुळे फांदीवर फुलांची संख्या वाढते.
- पेरूची सर्व फळे जाड फांदी व खोडावर येत असल्यामुळे त्याचा आकार व प्रतही चांगली मिळते.
- झाडाची मे महिन्यात छाटणी करताना जाड फांद्या ठेवून बाकीच्या सर्व बारीक काड्या छाटाव्यात. झाडाच्या मुख्य खोडापासून आलेल्या चार ते पाच उपयुक्त फांद्या आणि त्यानंतर आलेल्या लहान फांद्या अशा प्रकारे झाडांना आकार देण्यात येतो.
- जुन महिन्यात पाऊस पडल्यानंतर किंवा गरजेप्रमाणे पाणी दिल्यानंतर झाडांना फूट येण्यास सुरूवात होते. पाण्याची उपलब्धता असेल तर लवकर छाटणी करून हंगामापूर्वी फळे बाजारपेठेत पाठविता येतात.
- पाणी देण्याअगोदर शिफारशीत मात्रेमध्ये शेणखत, रासायनिक खते आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये झाडाच्या खोडाभोवती रिंग करून द्यावेत किंवा ठिबक मधून सोडावेत (शेणखत सोडून).
- झाडाला पालवी आल्यानंतर सुरूवातीला फुले हे झाडाच्या जाड फांद्या आणि खोडावर येतात. या फळाचा आकार, वजन आणि गुणवत्ता चांगली असते. फळांची गोडी चांगली असते. झाडाला भरपूर फूट येऊन पानांची संख्या चांगली मिळते. नंतरचा बहार हा नविन आलेल्या शेंड्यांना येतो.
- पेरूच्या पहिल्या फळाची काढणी सप्टेंबर - ऑक्टोबर मध्ये होते. तर दुसरी फळे फेब्रुवारी-मार्च किंवा यापेक्षा थोडी उशीरा मिळतात. फळाला चांगला बाजारभाव मिळतो.
- फळांच्या उत्पादनानुसार झाडांना दोनदा चाळणी करावी लागते. झाडांच्या जुन्या मुळ्या तुटून नवीन पांढरी मुळे येण्यासाठी शेत भुसभुशीत ठेवावे. आंतरमशागतीसाठी पॉवर टिलरचा वापर करावा म्हणजे खर्चात बचत होते.

### सघन लागवडीचे फायदे:

- एकरी जास्त झाडे लावली जातात, त्यामुळे प्रतिझाड फळांची संख्या कमी असली तरी एकूण उत्पादनात वाढ होते.
- असलेल्या साधन सामुग्रीचा पुरेपूर वापर.
- शेतकरी वर्षभर शेतात काम करू शकतात.
- आंतरमशागत करण्यास सोपे जसे - फवारणी, छाटणी, खुरपणी, काढणी इत्यादी.
- दोन झाडांतील अंतर कमी असल्याने खते व पाण्याचा योग्य वापर केला जातो.
- १८ व्या महिन्यात पहिले उत्पादन मिळते.
- जस जसे झाडाचे वय वाढत जाते तसतसे उत्पादनात लक्षणीय वाढ होते.
- मजुरांना वर्षभर रोजगार निर्माण होण्याची संधी.

(संपर्क: +९१ ८८८८३४८०५०)